# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबईतील कफ परेड मेट्रो स्टेशनला महानायक वसंतरावजी नाईक यांचे नाव देण्याबाबत

**(१) १६९३ (२३-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कफ परेड (मुंबई) येथील मेट्रो स्टेशनला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे नाव देऊन "वसंतरावजी नाईक कफ परेड मेट्रो स्टेशन" असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी बंजारा समाजाचे लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात येऊन कफ परेड मेट्रो स्टेशनला वसंतरावजी नाईक यांचे नाव देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मुंबई मेट्रो मार्ग-३ मधील स्थानकांची ही नावे केंद्र सरकारच्या दिनांक १९/०९/२०२४ रोजीच्या राजपत्रानुसार निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार "कफ परेड मेट्रो स्थानक" हे नाव सर्व कार्यकारी, वैधानिक आणि प्रवासी सेवांमध्ये वापरात आहे. निर्धारित नामकरण पध्दतीनुसार मेट्रो स्थानकांची नावे त्या परिसरातील ओळखण्यास सोपी अशी स्थानिक स्थळे किंवा महत्त्वाच्या खुणांवर आधारित ठेवली जातात. त्यामुळे प्रवाशांना स्थानक ओळखणे व मार्गदर्शन होणे सोपे होते.

मेट्रो पॉलिसी २०१७ नुसार कार्यान्वयव व देखभाल (O& M) खर्चाचा भार कमी करण्यासाठी मेट्रो प्रशासनांना "स्टेशन सेमी-नेमिंग राईट्स" च्या साधनांवर गैर-महसूल उत्पन्न स्रोतांकरीता वापर करण्याबाबत सूचित केले आहे.

मुंबई मेट्रो लाईन-३ सध्या संपूर्णपणे कार्यान्वित असून स्थानकांची नावे या टप्प्यावर बदलणे प्रशासकीय, तांत्रिक तसेच संचालनात्मकदृष्ट्या योग्य मॅपिंग, सुरक्षा प्रमाणपत्रे आणि नेमिंग राईट्स करार यांच्यावर परिणाम होईल. परिणामी महसूल उत्पन्नावर प्रतिकुल परिणाम होईल. सबब, मेट्रो स्थानकाच्या नावात सद्य:स्थितीत बदल करणे उचित होणार नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे ३६६८ मोकळ्या जागा नाममात्र भाड्याने मक्ता करारावर दिल्या असल्याबाबत

**(२) १७७६ (१७-०४-२०२५) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे ३६६८ मोकळ्या जागा कित्येक वर्षे नाममात्र भाड्याने मक्ता करारावर दिल्या असल्याबाबतची माहिती माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सदर जागा ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे ३४७२ मोकळ्या जागा म्हणजेच रिक्त भूभाग हे मक्ता करारावर दिलेले नसून सदर रिक्त भूभाग हे भाडेतत्वावर देण्यात आलेले आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने रिक्त भूभाग भाडेपट्ट्याचे अधिमूल्य आकारून रिक्त भूभाग हे मक्त्यामध्ये रूपांतरित करण्याचे धोरण परिपत्रक दिनांक ०३/०३/२०२५ अन्वये पारित करण्यात आलेले होते. तदनंतर सदर परिपत्रकामध्ये योग्य ती सुधारणा करून सुधारित परिपत्रक दिनांक २८/०४/२०२५ अन्वये पारित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांतील वाहनतळ व्यवस्थापनाच्या आराखड्याबाबत

**(३) १८२४ (१७-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांतील वाहनतळ व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्यात येणार असून त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असल्याची बाब दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय, असल्यास सदरहू प्रस्तावात कोणकोणत्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांतील वाहनतळ व्यवस्थापन आराखड्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, अधिनियम ५१ अन्वये मुंबई वाहनतळ प्राधिकरणाची स्थापना करण्याकरीता व मुंबई वाहनतळ प्राधिकरण म्हणजेच एमपीए (MPA) स्थापन करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाहूर (मुंबई) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या रूग्णालयाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(४) १८९३ (१७-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाहूर, मुंबई येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या रूग्णालयाचे कामाकरीता सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात तरतूद करण्यात आलेला निधी अपूरा पडत असून अन्य विकास कामांकरीता तरतूद केलेला निधी रूग्णालयाच्या कामाकरीता वळविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणत्या विकासकामांचा किती निधी सदरहू रूग्णालयाच्या कामाकरीता वळविण्यात आला आहे, व सदरहू विकासकामांची सद्य:स्थिती काय असून सदरहू विकासकामांकरीता सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात किती निधी प्रस्तावित करण्यात आला असून सदरहू निधी त्या विकासकामांकरीता पुरेसा आहे का याची खातरजमा करण्यात आली आहे काय व त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरहू रूग्णालयाचे कामास माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यासुमारास सुरूवात करण्यात आली असून सदरहू काम ३६ महिन्यात म्हणजेच माहे मे, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याची मुदत संबंधित कंत्राटदाराला देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रूग्णालयाचे काम विहीत वेळेत पूर्ण होणेच्या अनुषंगाने सदरहू रूग्णालयाच्या कामाकरीता सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात किती निधीची तरतूद प्रस्तावित असून सदरहू निधी रूग्णालयाच्या उर्वरीत कामाकरीता पुरेसा आहे किंवा कसे याची सद्य:स्थिती काय आहे,
(५) असल्यास, रूग्णालयाचे काम किती कालावधीत पूर्ण होणार असून या रूग्णालयाच्या कामास आवश्यक तो निधी विहीत कालावधीत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे,
(२) सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात भांडूप पश्चिम मौजे नाहूरगाव येथील प्रस्तावित बहु वैशिष्ट्यपूर्ण रुग्णालयाच्या कामाकरीता रुपये ४५.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सदर तरतूद अपूरी असल्याचे निदर्शनास आल्याने इतर

विकास कामांचा रुपये ४९.०० कोटी इतका निधी सदरहू रूग्णालयाच्या कामाकरीता वळविण्यात आला त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| विकास कामे | सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातून निधी स्थानांतरण | सन २०२५-२६ साठी अर्थसंकल्पीय तरतूद | कामाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| कार्यकारी आरोग्य खाते व प्र.वै.अ.अंतर्गत विविध प्रसूतिगृहे/ दवाखाने /पॉलिक्लिनिक/आरोग्य केंद्राची दुरुस्ती/ नुतनीकरण /पुनर्विकास करणे. | ७ कोटी | ६.२० कोटी | कामे प्रगतीपथावर |
| कार्यकारी आरोग्य खाते व प्र.वै.अ.अंतर्गत विविध प्रसूतिगृहे/दवाखाने /पॉलिक्लिनिक/आरोग्य केंद्राची दुरुस्ती/ नुतनीकरण /पुनर्बांधणी/नवीन बांधकाम/पुनर्विकास करणे. | ७ कोटी | १८.४१ कोटी | बहंतांश कामे पूर्ण |
| कार्यकारी आरोग्य खाते व प्र.वै.अ.अंतर्गत विविध प्रसूतिगृहे/दवाखाने /पॉलिक्लिनिक/आरोग्य केंद्राची दुरुस्ती/ नुतनीकरण/दर्जोन्नती/ पुनर्बांधणी /नवीन बांधकाम/पुनर्विकास करणे. | ५ कोटी | १३.१० कोटी | बहुतांशी कामे नियोजन टप्प्यात आहे. तर काही कामे प्रगतीपथावर आहेत |
| कार्यकारी आरोग्य खाते व प्र.वै.अ.अंतर्गत विविध प्रसूतिगृहे/दवाखाने /पॉलिक्लिनिक/आरोग्य केंद्राची दुरुस्ती/ नुतनीकरण/दर्जोन्नती/ पुनर्बांधणी /नवीन बांधकाम/पुनर्विकास करणे. | २ कोटी | -- | बहुतांशी कामे नियोजन टप्प्यात आहे |
| एल विभागातील संघर्षनगर येथे सी.टी.एस.११ए/४ चांदिवली गाव येथील रुग्णालयासाठी राखीव जागेचा (आर एच १.२) विकास | २० कोटी | ५० कोटी | काम प्रगतीपथावर आहे |
| सार्वजनिक आरोग्य खाते अंतर्गत १५९ दवाखान्यांची दुरुस्ती व आधुनिकीकरण | २ कोटी | १.५ कोटी | कार्यादेश देण्यात आला |
| ॲक्वर्थ रुग्णालयाच्या आवारात आरोग्य भवन बांधणे | २ कोटी | ०.५ कोटी | काम नियोजन टप्प्यात आहे |
| वि.मो.मेहता मनपा सर्वसाधारण रुग्णालयातील | १ कोटी | ५ कोटी | काम |

| विकास कामे | सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातून निधी स्थानांतरण | सन २०२५-२६ साठी अर्थसंकल्पीय तरतूद | कामाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| प्रस्तावित संरचनात्मक दुरुस्त्या | | | प्रगतीपथावर आहे |
| ॲक्वर्थ कुष्ठरोग रुग्णालय/जन्म मृत्यू नोंदणी इमारत कँम्पसमध्ये सध्या असलेल्या रचनेची दुरुस्ती व सुधारणा करणे आणि नवीन रचना करणे | ३ कोटी | ०.०४ कोटी | काम प्रगतीपथावर आहे |

ज्या विकास कामांचा निधी वळविण्यात आला आहे त्यांच्या प्रगतीवर निधी वळविल्यामुळे काहीही परिणाम होणार नाही.

(३) हे खरे आहे.

सदर कामाची सुरूवात सप्टेंबर २०२२ मध्ये सुरू झाली आहे. सदर कामाचा कालावधी ३६ महिने (पावसाळ्यासहित) इतका आहे. सदर काम पूर्ण करण्याची मूळ तारीख सप्टेंबर २०२५ अशी होती. तथापी काम करण्यातील अडथळे लक्षात घेऊन सदर कामाच्या पूर्णत्वाची तारीख ०६/०५/२०२६ अशी पुढे ढकलण्यात आली आहे.

(४) सदरहू कामाकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रुपये १८० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. रूग्णालयाच्या उर्वरित कामाकरीता सदरहू निधी पुरेसा आहे.

(५) सदरहू रूग्णालयाचे काम २५% पूर्ण झाले असून कामाची प्रगती नियोजित वेळापत्रकाप्रमाणे आहे व सदरहू काम विहित वेळेत म्हणजेच ०६/०५/२०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदरहू कामाकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रुपये १८० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ च्या नियोजनामध्ये विविध कामांचा समावेश करण्याबाबत

**(५) १९२२ (१७-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा, २०२७ नियोजनामध्ये गोदावरी नदी स्वच्छता, त्र्यंबकेश्वर कुशावर्त तीर्थ स्वच्छता, शहराच्या बाहेरील व शहरांतर्गत असलेले रिंगरोडचा विकास, साधुग्रामच्या जागेवर प्रगती मैदानच्या धर्तीवर सुविधा इत्यादी कामांचा नियोजनात समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान महानगरपालिका, आयुक्त नाशिक तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अध्यक्ष नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडील दिनांक ९ जुन २०२५ अन्वये नाशिक महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या मलशुध्दीकरण प्रकल्पास सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावर करणेस र.रुपये १४८२.९५ कोटीचे कामास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. साधुग्राम येथे २ दशलक्ष क्षमतेचे दोन नवीन जलकुंभ बांधणे र.रुपये ८.०४ कोटी व विल्होळी येथे जलशुद्दीकरण केंद्र बांधणे व जलशुध्दीकरण केंद्र ते साधुग्राम पर्यंत मुख्यगुरुत्ववाहिनी टाकणे र.रुपये ३९५.७८ कोटी यास दिनांक ०९/०९/२०२५ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. नाशिक शहरात ओएफसी केबल टाकणेचे र.रुपये १२८.९८ कोटीचे कामास प्रशासकीय मान्यता दिनांक ०९/०९/२०२५ अन्वये प्राप्त झाली आहे. रस्ते कामांसाठी र.रुपये ९३०.२३ कोटी आणि पुलांच्या कामांचा र.रुपये ६२.८० कामांना दिनांक १४/०९/२०२७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मुंबईतील वृत्तपत्र विक्रेत्यांना संरक्षण मिळण्याबाबत

**(६) २१२४ (१७-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाच्या कारवाईतून पालिका हद्दीतील वृत्तपत्र विक्रेत्यांना वगळून संरक्षण देण्याची मागणी बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघटनेने मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मुंबईतील वृत्तपत्र विक्रेत्यांना संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) उप आयुक्त (परि-२), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ०९/०४/१९९९ रोजी दिलेल्या आदेशांनुसार वृत्तपत्र विक्री करणारे ज्या ठिकाणी व्यवसाय करित आहेत. त्या जागेवर अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई न करण्याबाबत दिनांक १३/०४/१९९९ चे परिपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सर्व २४ विभाग कार्यालयांना पारित करण्यात आले आहे. तसेच, दिनांक २४/१०/२०१७ व दिनांक ०७/०२/२०२४ अन्वये संबंधितांना वृत्तपत्र विक्रेत्यांवर अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई न करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिडकोकडून कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) विभागाचा पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरणाचा विषय अंतिम टप्प्यात असताना गामस्थांनी दिलेल्या निवेदनाबाबत

**(७) २२८१ (१७-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे विभागाचा (ता.पनवेल, जि.रायगड) सिडकोकडून पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरणाचा विषय अंतिम टप्प्यात आला असताना कामोठे ग्रामस्थांच्या वतीने गाव पंच कमिटीतर्फे सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी निवेदन दिल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनात पनवेल महानगरपालिकेने प्रकल्पग्रस्तांची घरे तोडू नये, कामोठे गावासाठी खेळाचे मैदान आरक्षित केले जावे, गावाच्या भोवती पार्किंग प्लॉट मिळावेत, प्रकल्पग्रस्तांसाठी कम्युनिटी सेन्टर बनवावे, गावासाठी पाण्याची लाईन व टाकी बसवून द्यावी इ. प्रलंबित प्रमुख मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामोठे ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनातील प्रलंबित मागण्यांचे निराकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) व (२) कामोठे गावातील नियोजित सेक्टर क्र. ७, ११, १४ व इतर मध्ये नियोजनाच्या दृष्टीकोनातून गावांसाठी खेळाचे मैदान, खुली मैदाने, पार्किंग, सामाजिक सुविधा (कम्युनिटी सेंटर) आणि सार्वजनिक सुविधा (पाण्याची टाकी/इएसार) इतर सर्व भूवापर प्रयोजन करण्यात आले आहे.

सिडको महामंडळाकडून पनवेल महानगरपालिकेकडे बहुतांशी सोयी सुविधा भूखंड हस्तांतरण झालेले असून उर्वरीत भूखंड हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत बांधकामाच्या ठिकाणी होणाऱ्या प्रदुषणाची आणि हवेच्या गुणवत्तेची अचूक स्थिती कळण्यासाठी प्रदूषण देखरेख उपकरण बसविण्याबाबत

**(८) २४१६ (१७-०७-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.संजय केणेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४२९ ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत बांधकामाच्या ठिकाणी होणाऱ्या प्रदुषणाची आणि हवेच्या गुणवत्तेची अचूक स्थिती कळण्यासाठी बांधकामे सुरु असलेल्या ठिकाणांवर प्रदूषण देखरेख उपकरण बसविण्याचे आणि त्याचे पालन न करणारी बांधकामे थांबविण्याचे थेट आदेश मा.उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला नुकतेच माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते हे खरे आहे काय,
(२)असल्यास, किती बांधकामांच्या ठिकाणी प्रदूषण देखरेख उपकरण बसविण्यात आले आहेत,
(३) असल्यास मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पालन न करणाऱ्या किती बांधकामांवर महापालिकेद्वारे आतापर्यंत कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) मुंबई शहर व उपनगर भागात महाराष्ट्र गृहनिर्माण नियामक प्राधिकरण (महा-रेरा) नुसार सध्या एकूण ६४८० बांधकाम प्रकल्प नोंदणीकृत आहेत. मुंबई शहर व उपनगर भागात महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागातर्फे एकूण १०३९ बांधकाम प्रकल्पांना मान्यता दिली असून विभागातर्फे ८८६ बांधकाम प्रकल्पांवर आतापर्यंत वायु प्रदूषण मापन संयंत्रे बसविण्यात आली आहेत.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून, नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना (Intimation) दिल्यानंतर "कारणे दाखवा नोटीस" आणि "काम थांबवण्याची नोटीस" देण्यात येत आहे. ऑक्टोबर, २०२४ ते मार्च, २०२५ पर्यंत महापालिकेद्वारे सुमारे ४४८८ ठिकाणी कारणे दाखवा नोटीस व सुमारे २३८५ ठिकाणी काम थांबवण्याची नोटीस देण्यात आली असून सदर कार्यवाही सातत्याने सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कन्नमवारनगर, विक्रोळी येथील जलतरण तलावाचे दोनवेळा भूमिपूजन करुनही काम सुरु केले नसल्याबाबत

**(९) २५५२ (१७-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कन्नमवार, विक्रोळी येथील जलतरण तलावाचे दोनवेळा भूमिपूजन करुनही २६ वर्षे झाली असून अद्यापही जलतरण तलावाचे काम अद्याप सुरु करण्यात आले नसून तलावासाठी राखीव असलेला भूखंड मोकळा पडून असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरील जलतरण तलावाचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०३-२०२६) :** (१) सदर बाब सत्य नाही.
बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुंबईतील कन्नमवार नगर, विक्रोळी येथे जलतरण तलावाचे बांधकाम सुरू करण्यात आलेले नाही व प्रस्तावित नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामांना मान्यता दिल्याने पर्यावरण व पायाभूत सुविधांवर ताण येत असल्याबाबत

**(१०) २५५५ (१७-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वाढत्या विकासकामांमुळे पर्यावरण, पायाभूत सुविधांवर ताण पडत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामांना मान्यता दिल्याने पर्यावरण, पायाभूत सुविधांवर ताण पडत असून शासनाने मुंबई शहराचे सर्व दृष्टीने सर्वेक्षण करुन सर्वकष अभ्यास करुन पर्यावरण, पायाभूत सुविधांवरील ताण कमी करण्याबाबत तसेच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १३ मार्च २०२२ रोजी मुंबई वातावरण कृती आराखडा (MCAP) प्रकाशित केला असून, २०५० पर्यंत मुंबईला नेट-झीरो आणि वातावरण अनुकूल शहर बनविण्याचा निर्धार केला आहे.

मुंबई वातावरण कृती आराखड्यामध्ये हरितगृह वायू उत्सर्जन (CHG Emission) कमी करून व वाढत्या वातावरणीय जोखमींना सामोरे जाण्यासाठी वातावरण-अनुकूलन उपाययोजना समाविष्ट करून, पॅरिस कराराच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशी एक धोरणात्मक रूपरेषा मांडलेली आहे. वातावरणीय बदलामुळे निर्माण होणाऱ्या संकटाचा परिणाम सध्या विविध प्रकारांनी नागरिकांवर होत असल्याची जाणीव बृहन्मुंबई महानगरपालिकेला असून, श्वासत आणि समावेशक भविष्यासाठी तातडीने कारवाई करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींच्या बांधकामावेळी होणारे वायुप्रदूषण नियंत्रित करण्याकरीता दिनांक २५/१०/२०२३ व दिनांक ०८/१०/२०२४ अन्वये सर्वकष मार्गदर्शक सूचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. इमारत विकास पुनर्विकासाची परवानगी देताना, आयओडी मध्ये सदर सूचनांचे पालन करण्याची अट समावेश करण्यात येते. तसेच सदर परिपत्रकाद्वारे प्रत्येक विभाग कार्यालयात नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली असून सदर अधिकारी हे प्रस्तावित प्रकल्पांची स्थळपाहणी करुन बांधकामामुळे होणारे वायुप्रदूषण टाळण्याकरीता व उपाययोजना करण्याकरीता संबंधित प्रस्तावाचे विकासक/वास्तुविशारद यांना वेळोवेळी सूचना देतात.

तसेच सदर दिलेल्या सूचनांचे पालन होत नसल्यास, सदर बाबतीत त्यांना काम थांबवण्याचे अथवा दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार संबंधित नोडल अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

मुंबई शहरातील पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी नव्याने पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांचे सक्षमिकरण करणे व आवश्यक त्या पायाभूत सुविधांची पूनर्बांधणी करणे या प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे नियमीत पणे सुरू आहेत.

पायाभूत सूविधा प्रकल्पांच्या पर्यावरण संतुलन राखण्यासाठी कार्यस्थळी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांनुसार आवश्यक त्या उपाययोजना नियमितपणे करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील कुर्ला-अंधेरी मार्गावरील बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या युनिव्हर्सल पदपथ धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(११) २५८० (१८-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कुर्ला-अंधेरी मार्गावरील एरोसिटी ते सफेद पूल पेट्रोल पंप या मार्गावर पदपथच नसून मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ रहात असल्याने पादचाऱ्यांना जीवाला धोका निर्माण झाल्याची बाब दिनांक ५ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई येथील पादचाऱ्यांची सुरक्षा आणि सुविधा वाढवून चांगले पदपथ मिळावेत या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने युनिव्हर्सल पदपथ धोरण तयार केले असून सदर धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१) व (२) कुर्ला-अंधेरी मार्गावरील एरोसिटी ते सफेद पूल पेट्रोल पंप या मार्गादरम्यान सफेद पूल नाल्यावरील पूलाचे पुनर्बांधणीचे काम सूरू असून सदर पूलाच्या पश्चिमे कडील दोन टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. पूर्ण झालेल्या पूलाच्या पश्चिमे कडील भागामध्ये पदपथाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पूलाच्या पूर्वेकडील अंतिम तीसऱ्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे नागरीकांना पश्चिमे कडील पदपथाचा वापर करण्यासाठी कार्यस्थळावर माहिती फलक देखील लावण्यात आलेले आहेत.

तसेच पूलाचे काम पूर्ण होताच दोन्ही बाजूकडील पदपथ नागरीकांना सुरक्षितपणे चालण्यासाठी उपलब्ध होतील. पूलाचा भाग वगळता सदर मार्गावरील उर्वरीत भागामध्ये पदपथ सुधारणा करतांना युनीव्हर्सल पदपथ धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ए वॉर्डमध्ये विकासकामांच्या निधीचा अपहार झाल्याबाबत

**(१२) २५९२ (१८-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “ए” वार्डमध्ये काही अधिकाऱ्यांचा अनागोंदी कारभार सुरु असल्यामुळे विकास कामांच्या नावाखाली निधी वाटपाचे काम सुरु असल्याची तक्रार दक्षता विभागाकडे नागरिकांनी केली असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधीचा अपहार करण्याच्या उद्देशाने कंत्राटदारांशी संगनमत करुन एकच काम तीन वेळा केल्याचे दर्शविण्यात आले असून अस्तित्वात नसलेल्या समाज मंदिराचे देयक काढण्याचा तसेच सागरी प्रवाह क्षेत्राच्या (सीआरझेड) नियमांचे उल्लंघन या अधिकाऱ्यांनी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबधीत अधिकारी/ कर्मचारी तसेच कंत्राटदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दक्षता विभागास 'ए' विभाग स्तरावरील विकास कामांत अनियमितता झालेबाबतची एक तक्रार प्राप्त झाली होती.
(२) हे अंशत: खरे आहे.

दक्षता विभागाने चौकशीअंती अहवाल सक्षम अधिकाऱ्याकडे दिनांक ३०/०४/२०२५ अन्वये सादर केला आहे. त्यामध्ये विभागस्तरावरील काही कामांमध्ये अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे सदर अधिकाऱ्यांवर प्रकरणाशी संबंधित पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे-
(१) श्री.प्रशांत सोनार, कनिष्ठ अभियंता यांची 'ए' विभागातून इतरत्र बदली करण्यात आली आहे.
(२) श्री.पवन कावरे, सहाय्यक अभियंता यांना 'ए' विभागातील अन्य प्रकरणात महानगरपालिका सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.
(३) श्री.जयदिप मोरे, सहायक आयुक्त यांना सदर प्रकरणात दक्षता विभागाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सक्षम अधिकाऱ्यांकडून कारणे दाखवा नोटीस दिनांक ०२/०६/२०२५ बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुलुंड येथे पक्षीगृह उभारण्याबाबत

**(१३) ३६०० (१८-०७-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुलुंड येथे लवकरच पक्षीगृह उभारण्यात येणार असून संग्रहालयास केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी मिळाली नसल्याने पक्षीगृहाचे काम प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्व उपनगरातील नागरिकांना आणखी काही दिवस पक्षीगृहासाठी प्रतिक्षा करावी लागणार असून केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुलुंड येथे प्रस्तावित पक्षीगृहाच्या उभारणीसाठी प्राणिसंग्रहालय सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली असून, सदर सल्लागरामार्फत पक्षीगृहाचा बृहत आराखडा (Master Layout) व सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report-DPR) तयार करण्यात

आलेली आहे. प्रस्ताव जुलै २०२४ मध्ये केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात आला होता.सदर प्राधिकरणामार्फत प्रस्तावास जानेवारी २०२५ मध्ये तत्वत: मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्राधिकरणाने काही अटी व शर्तीची पूर्तता करून सुधारित प्रस्ताव पुन्हा सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार लवकरच सुधारित प्रस्ताव केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण नवी दिल्ली यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.
(२) मुंबई महानगरपालिकेने मुलुंड येथे प्रस्तावित पक्षीगृहाच्या उभारणीसाठी नियुक्त केलेल्या प्राणिसंग्रहालय सल्लागाराने आराखड्यांची रेखाचित्रे, अंदाजपत्रके तसेच मसुदा निविदा तयार केलेली असून, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोतीमाल नगर, गोरेगाव, मुंबई येथील पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांचा पुनर्विकास होण्याबाबत

**(१४) ३९०७ (१८-०७-२०२५) श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोतीलाल नगर, गोरेगाव(प), मुंबई येथील पुनर्विकास प्रकल्पासाठी सन २०२१ मध्ये तत्कालीन शासनाने काढलेल्या शासन निर्णयामुळे मूळ रहिवाशांना वाढीव क्षेत्रफळ न मिळाल्याने सदर रहिवाशी हे पुनर्विकासापासून वंचित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांचा पुनर्विकास होण्याच्या दृष्टीने वाढीव क्षेत्रफळ देण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) नाही.
(२) मोतीलाल नगर १, २ व ३ या गोरेगाव, मुंबई येथील म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत निर्गमित केलेल्या दिनांक ०६/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सदर प्रकल्पग्रस्तांना वाढीव क्षेत्रफळ देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) लागू नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) येथील नगरपालिका क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलाची कामे अनुदानाअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ३९३८ (१७-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील नगरपालिका क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलाची कामे अनुदानाअभावी प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास

आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घरकुलांची कामे अपूर्ण असल्यामुळे नगरपालिकेकडे अनुदानाच्या हप्त्यासाठी लाभार्थी वारंवार विचारणा करीत असून अनुदानाअभावी घरकुल योजनेपासून वंचित राहणार असल्याने शासनाने तात्काळ नगरपालिकेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही,

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दिनांक १७/०२/२०२५ रोजी रुपये ३७९.७५ लक्ष निधी प्राप्त झाला असून त्यापैकी लाभार्थ्याच्या खात्यात घरकुलाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने वर्ग करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही,

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ९०९ लाभार्थ्यांना कार्यरंभ आदेश देऊन ७६२ घरे पूर्ण झालेले आहे व उर्वरित १४७ घरे प्रगती पथावर आहेत. सदर कामाच्या प्रगतीनुसार रुपये १८९०.६ लक्ष इतका निधी लाभार्थ्याच्या खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे.

उर्वरित रुपये ३८१.९ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ नगरपालिकांतर्गत (जि.जळगांव) सफाई कामगारांच्या समस्यांबाबत

**(१६) ३९६० (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ नगरपालिका अंतर्गत(जि.जळगांव) सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी, वेतन, सेवा निवृत्ती नंतरचे लाभ व इतर समस्यांचे निराकरण होणे संदर्भात अखिल भारतीय सफाई कामगार संघटनेचे प्रदेश सचिव यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, भुसावळ यांचेकडे दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,जळगाव जिल्ह्यातील भुसावळ नगरपालिकेंतर्गत सफाई कामगारांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे,

सदर विषयाबाबत महाराष्ट्र प्रदेश सचिव, अखिल भारतीय सफाई कामगार संघठन, नवी दिल्ली यांचे दिनांक २१/०४/२०२५ रोजीचे निवेदन भुसावळ नगरपरिषदेस प्राप्त झाले आहे.
(२) सदर निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने भुसावळ नगरपरिषदेमार्फत कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच भुसावळ नगरपरिषदेतील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचे थकीत लाभ देण्याकरीता अनुदान मिळण्याबाबत आणि भुसावळ नगरपरिषदेच्या क्षेत्रफळ व लोकसंख्येनुसार सफाई कामगारांची पदसंख्या वाढवून मिळण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयास नगरपरिषदेमार्फत अनुक्रमे दिनांक

०२/०४/२०२५ व दिनांक ०४/०७/२०२५ रोजीच्या पत्रांन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला असून, त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिका हद्दवाढ प्रस्तावाबाबत

**(१७) ४०४६ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिका हद्दवाढ प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असल्याने रस्ते, गटारी, वीज, पाणी, आरोग्य या सारख्या नागरी सुविधा उपलब्ध करून देताना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी भुसावळ नगरपालिकेच्या हद्दवाढ प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) मा.राज्य निवडणुक आयोगाने त्यांच्या दिनांक १० मे, २०२२ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील २५ जिल्हा परिषदा व २८४ पंचायत समित्याच्या सार्वत्रिक निवडणूकाचा प्रभाग रचनेबाबतचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे, त्यामध्ये जळगाव जिल्हापरिषदेचा समावेश आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २४ मे, २०२२ रोजीच्या आदेशान्वये, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण होईपर्यंत त्यांच्या हद्दीमध्ये व रचनेमध्ये कोणताही बदल करु नये असे निर्देश दिले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांडेवाडी डम्पिंग यार्डात (जि.नागपूर) वारंवार आगी लागत असल्याने यार्ड इतरत्र स्थलांतरित करण्याबाबत

**(१८) ४११२ (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडेवाडी डम्पिंग यार्ड(जि.नागपूर) मध्ये लागलेली आग विझवण्यासाठी अग्निशमन दलास दहा दिवस प्रयत्न करावे लागले असून सदर आगीच्या धुरामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होवून पर्यावरणाची हानी झाली असल्याची बाब माहे मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुलसी नगर,अब्बूमिया नगरातील रहिवाशांना श्वसनाचा, त्वचेचे व डोळयांचे विकार सुरु झाले असून या भागात कार्बन मोनॉक्साईड डाय ऑक्सिजन आणि हायड्रोजन सायनाड यांची वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भांडेवाडी डम्पिंग यार्डात (जि.नागपूर) वारंवार आगी लागत असल्याने हे यार्ड इतरत्र स्थलांतरित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-१२-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे तुलसी नगर, अब्बुमिया नगर परिसराच्या समोरील डम्पिंग यार्डच्या भागात दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी १३.२७ वाजता सूचना प्राप्त झाली होती. सुचना प्राप्त होताच लकडगंज अग्निशमन केंद्र व वाठोडा अग्निशमन केंद्रातील अग्निशमन वाहन घटनास्थळावर रवाना करण्यात आले. परंतु आगीचे मोठे स्वरुप लक्षात घेता अग्निशमन विभागाच्या कळमना, सुगत नगर, सिव्हील, त्रिमुर्ती नगर, नरेंद्र नगर व सक्करदरा अग्निशमन केंद्रातील अग्निशमन वाहने सुद्धा घटना स्थळावर रवाना करुन आगीवर नियंत्रण मिळवण्याचे कार्य करण्यात आले व दिनांक ०१ मे, २०२५ रोजी आग पूर्णपणे विझविण्यात आली. यामुळे तात्पुरत्या आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्या होत्या.
(२) हे खरे नाही.

भांडेवाडी डम्पिंग यार्ड परिसरात आयोजित आरोग्य शिबीरातील श्वसनाचे, त्वचेचे व डोळयांच्या विकारांनी बाधित रुग्णसंख्या विचारात घेता वेळीच औषधोपचार करण्यात आले आहेत.
(३) भांडेवाडी डम्पिंग यार्ड इतरत्र स्थलांतरित करण्याबाबत नागपूर महानगरपालिकेकडे कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील विजापूर रोड आणि होटगी रोड येथील सर्विस रोडच्या जागांवर अतिक्रमण होत असल्याबाबत

**(१९) ४११६ (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विजापूर रोड आणि होटगी रोड (जि.सोलापूर) येथील सर्विस रोडच्या जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असल्याने वाहतुकीस समस्या उद्भवत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विजापूर रोड आणि होडगी रोड येथील सर्विस रोडवरील अतिक्रमणे तात्काळ हटवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विजापूर रोड येथील सर्विस रोडच्या जागेवरील अतिक्रमण निष्काशित करण्याबाबत स्थानिक वृत्तपत्रातून दिनांक ११/०४/२०२५ रोजी जाहीर प्रसिध्दीकरण देण्यात आले होते. सदर अतिक्रमण कारवाई विरोधात अतिक्रमण धारकांनी न्यायालयात दाद मागितल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने सदर कारवाईस

तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.

होटगी रोड येथे रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हे सोलापूर महानगरपालिकेमार्फत निष्काषित करण्यात येत असून रहदारीस अडथळा होऊ नये याबाबतची खबरदारी महानगरपालिकेमार्फत घेण्यात येत आहे.

---

## उल्हासनगर कॅम्प ४ (जि.ठाणे) येथील आरजीएस शाळेसमोरील जुने भाजी मार्केटच्या पुनर्बांधणीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(२०) ४२३७ (१८-०७-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)उल्हासनगर कॅम्प ४ (जि.ठाणे) येथील आरजीएस शाळेसमोरील जुने भाजी मार्केटच्या पुनर्बांधणीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून कामाच्या ठिकाणी जुन्या भिंतीवर प्लास्टर करून नवीन बांधकाम करण्यात आल्याने संपूर्ण कामाची गुणवत्ता ढासळली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर भाजी मार्केटच्या पुनर्बांधणीचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) तात्काळ सदर कामाची पाहणी करुन कामाचे जागेवर संबंधित कंत्राटदार मे.व्हि. के. कंन्स्ट्रक्शन यांना सदर बांधकाम तात्काळ तोडावे व कामाचे तांत्रिक लेखा परिक्षण करणेबाबत दिनांक २९/०३/२०२५ रोजी शहर अभियंता यांचे नोटीसद्वारे कळविले. दिनांक ०४/०४/२०२५ रोजी निष्कृष्ट झालेले बांधकाम पूर्णपणे तोडण्यात आले, सद्य:स्थितीत मंजूर आराखड्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचे निरीक्षणाखाली नव्याने बांधकाम सुरु करण्यात आले. सद्य:स्थितीत काम पूर्ण झाले आहे. कामाचे तांत्रिक लेखा परिक्षण (Third Party Audit) करण्याकरीता शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे यांना दिनांक २६/०९/२०२५ रोजी पत्र देण्यात आले असून तांत्रिक लेखा परिक्षण (Third Party Audit) पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.